# ११. इंधनबचत

• ऐका. वाचा.



दिनूची आई आजारी होती. तो स्वयंपाकघरात आईसाठी चहा करत होता. दारावरची बेल वाजली. त्याने दार उघडले, तर समोर त्याची वर्गमैत्रीण फातिमा उभी होती. त्याने तिला घरात बोलावले.

**दिनू** : फातिमा ये. बस.

**फातिमा** : दिनू, तू काय करतोस?

**दिनू** : आईसाठी चहा करतोय. तुझ्यासाठीही करू का?

**फातिमा** : (हसत-हसत) नको, मी चहा घेत नाही. काय रे! एक कप चहा करण्यासाठी एवढं मोठं पातेलं?

**दिनू** : काय बिघडलं?

**फातिमा** : अरे, छोटं पातेलं घेतलं असतंस, तर पाणी लवकर उकळलं असतं.

**दिनू** : हे माझ्या लक्षातच आलं नाही.

**फातिमा** : अरे, छोट्या पातेल्यामुळे चहा लवकर झाला असता आणि हो ! इंधनाची म्हणजे गॅसचीही बचत झाली असती. समजलं?

**दिनू** : समजलं. समजलं आणि लक्षातही आलं. दिनूने चहा कपात ओतला आणि आईला नेऊन दिला.

## स्वाध्याय


**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) हा संवाद कोठे झाला?


(आ) संवादात किती पात्रे आहेत?

(इ) दिनूला कशाचे महत्त्व पटले?

**प्र. २. खालील चित्रे पाहा. त्यांखालील वाक्ये वाचा. इंधनबचतीचे आणखी मार्ग सांगा.**




**पाणी तापवताना पातेल्यावर झाकण ठेवा.**



**सायकलवरून प्रवास करा.**









**बसने, रेल्वेने प्रवास करा.**



**सौरऊर्जेचा वापर करा.**

**प्र. ३. खालील साधने ओळखा. ही साधने वापरण्यासाठी कोणते इंधन लागते? यांपैकी कोणते साधन वापरल्यामुळे सर्वांत जास्त इंधनबचत होते ते घरी चर्चा करून सांगा.**

## वाचू आणि हसू.

**सनी** : आई, वाढदिवसाला मी तुला आरसा देणार आहे.

**आई** : अरे सनी, पण आपल्याकडे आहे ना आरसा!

**सनी** : अगं आई, तो मघाशीच माझ्याकडून फुटला ना!

